शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक एप्रिल २०१७
अंक क्र. ३१
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 46 अंक : 5 कोल्हापूर ता. 8 मे 2017 किंमत 2 रुपये Reg. No. KLR 136/15-17 Posted in Kolhapur RMS

## १५ वे भिडे कुल संमेलन - २०१७

धाकटी वनदेवी मंदिर, मु. वन, मूळगांव, गोवा येथे १५ वे भिडे कुलसंमेलन दिनांक २१ व २२ जानेवारी २०१७ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. उपस्थित भिडे मंडळींकडून विशेषतः गोवा स्थित मंडळींकडून दोन्ही दिवसांचे कार्यक्रम व भोजन व निवास व्यवस्था ह्यांबद्दल खूपच चांगल्या प्रतिक्रिया मिळाल्या.

गोवा येथील भिडे कुल संमेलन यशस्वी होण्यासाठी गोवा येथील स्थानिक भिडे मंडळींचे प्रतिष्ठानने कौतुक करावे तितके थोडेच आहे. त्यांनी नाशिक संमेलनानंतर पुढील संमेलनाची जबाबदारी घेतली आणि उत्तम प्रकारे संमेलन करण्याचा निर्धार व विश्वास सार्थ ठरविला.

श्री. आदित्य, श्री. प्रभाकर, सौ. मालिनी इत्यादी रायबंदर येथील तसेच श्री. प्रवीण, श्री. प्रशांत इत्यादी वन येथील मंडळींनी सर्व भिडे मंडळींना एकत्र करून वेळोवेळी बैठकीच्या वेळी आत्मविश्वास दाखविला तो कौतुकास्पद होता. १५ ते २० जणांची एक छोटी टीम तयार करून प्रत्येकाकडे निवास, भोजन, कार्यक्रम ही व्यवस्था वितरित केल्यामुळे प्रत्येकाने ही जबाबदारी समर्थपणे सांभाळली. नियोजन व्यवस्थित आणि प्रत्येक बारीकसारीक गोष्टींचा विचार. उदाहरण म्हणजे निवास व्यवस्थेमध्ये टूथपेस्ट, मच्छर अगरबत्ती, साबण इत्यादी आवश्यक वस्तू तसेच जेवणानंतर फळफळावळ किंवा शहाळे इत्यादी बाबी मनाला भावून गेल्या. वास्तविक गोवा येथे कुलसंमेलन होणार आणि येणाऱ्यांची व्यवस्था उत्तम होणार अशी खात्री होती. परंतु अपेक्षेपेक्षा सुद्धा उत्तम व्यवस्था झाली. अगदी केटरर सुद्धा भिडे. हा तर अनुभव प्रथमच होता. श्री. प्रभाकर भिडे, रायबंदर गोवा यांची संमेलनाध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली आणि टीम कामाला लागली.

संमेलनामध्ये तरुणांना प्राधान्य देऊन त्यांची उपस्थिती वाढण्यासाठी प्रतिष्ठान नेहमीच प्रयत्नशील असते. ह्या हेतूने कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली. त्यादृष्टीने 'मामाच्या गोव्याला जाऊया' हा कार्यक्रम श्री. मिलींद भिडे ह्यांनी नियोजन करून सुमारे २ तासांचा कार्यक्रम मनोरंजक झाला. ह्याद्वारे गोव्याची व गोव्यातील राहणीमान, सवयी, त्यांचे खाणेपिणे, निसर्ग, भाषा यांची माहिति ह्या कार्यक्रमातून दाखविली. तसेच दुसऱ्या दिवशी गिरगांव येथील श्री. सतिश भिडे ह्यांनी दिवसाची सुरुवात सावरकर ह्यांच्या उत्स्फूर्त गीतांनी केली. त्यानंतर 'आम्ही भिडे'च्या ३० व्या



दीपप्रज्वलन प्रसंगी डावीकडून प्रतिष्ठानचे सचिव श्री. दिलीप, कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार, उपाध्यक्ष श्री. प्रभाकरपंत, अध्यक्ष श्री. कुमार आणि संमेलनाध्यक्ष श्री. प्रभाकर आणि रामकृष्ण भिडे

वार्षिक अंकाचे प्रकाशन संमेलन अध्यक्षांच्या हस्ते झाले. भिडे तरुण महिला वर्गाने केलेल्या विविध राज्यांतील वेशभूषा करून सर्वार्थाने भारत कसा एकसंघ आहे हे नृत्यकलेतून दाखवून दिले. रत्नागिरीच्या नवोदित कलाकार मृण्मय भिडे याचे सिंथेसायझर वादन आणि पुण्यातील अमित भिडे याने गणेशावर काही हिंदी, मराठी गीते सादर केली. दुपारच्या सत्रामध्ये प्रतिष्ठानच्या आधारस्तंभ आणि मनाने तरुण असलेल्या ज्येष्ठ सल्लागार श्रीमती शशीताईंनी पुरस्कृत केलेला माहेरवाशिणींचा सन्मान पैठणी देऊन केला. **त्यानंतर पुढील वर्षीच्या संमेलनाचे स्थळ ठरविण्यासाठी एकत्र बसून संमेलनाचा आढावा घेण्यात आला.** त्या कार्यक्रमासाठी दरवर्षीप्रमाणे भरपूर प्रतिसाद मिळाला. पसायदान व आभार प्रदर्शनानंतर गोवा संमेलनाची सांगता झाली.

संमेलनाचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तशी स्टेजची रचना, रजिस्ट्रेशन काऊंटर, हार, गुच्छ, फुले इ. काम गोवा स्थानिक भिडे मंडळींनी नियोजनात्मक केले. त्याच प्रमाणे केळीच्या पानांचे व केळीचे खुंट यांचे एक देवघर बनवून त्याचे केलेले डेकोरेशन अप्रतिम होते. त्याचे सर्व फोटो भिडे प्रतिष्ठानच्या वेबसाईटवर दिलेले आहेत. ह्यावर्षी प्रथमच संस्कृत व वैदिक असे दोन पुरस्कार आणि माहेरवाशिणींचा सन्मान केला गेला. माहेरवाशिणींचा सन्मान करताना ड्रॉ पद्धतीने सोडत काढून त्यापैकी नावे निघणाऱ्या माहेरवाशिणींना पैठणी देण्यात आली. (पान २ कॉलम २)

# विवाह सुवर्णोत्सव

ज्या भिडे कुल बंधू, भगिनी आणि माहेरवाशिणी दांपत्यांच्या विवाहाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत किंवा झालेली आहेत अशा दांपत्यांनी लग्न झाल्यापासून आपल्या सहचारिणीच्या साथीने व्यतीत केलेली ५० वर्षातील एखादी संस्मरणीय आठवण, घटना किंवा अनुभव शब्दबद्ध करावेत. लेखन/कविता १५० शब्दांपेक्षा शक्यतो जास्त असू नये. तसेच लेखाबरोबर दोघांचा फोटो पाठवावा. त्याचप्रमाणे आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि घराणे लिहिणे आवश्यक आहे. असे लेख/कविता 'आम्ही भिडे' अंकामध्ये प्रकाशित करणार आहोत.

अधिक माहितीसाठी संपर्क : दिलीप भिडे, पुणे मो. ९६५७५४१२३६ किंवा ले. क. सुनिल भिडे (पुणे) मो. ९६२३०१७४४४ किंवा ई-मेलसाठी office@bhidekul.in व dilip.bhide15@gmail.com येथे पाठवावेत.

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे. १) श्री. शरद शंकर भिडे, कल्याण

आम्ही भिडे अंक ३१ वा

संपादक : श्री. शशिकुमार केशव भिडे
कार्यकारी संपादक : ले. क. सुनिल भिडे
संपादक मंडळ : श्री. दिलीप भिडे, श्री. प्रभाकर भिडे, श्री. चिंतामणी भिडे सौ. प्रिया भिडे, सौ. प्रिती प्र. भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे श्री. विनायक भिडे.
सल्लागार मंडळ : श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, के. मो. भिडे, श्रीमती शशिताई घुले, डॉ. प्रतिभा भिडे, ठाणे, श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे
अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

९२, शुक्रवार पेठ येथील कार्यालय तात्पुरते बंद आहे. त्याठिकाणी पत्रव्यवहार करु नये. त्या ऐवजी पत्रव्यवहारासाठी पत्ता या ठिकाणी संपर्क/पत्रव्यवहार करावा, ही नम्र विनंती आहे.

पत्रव्यवहारासाठी पत्ता
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१, पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३० मो. ९६२३०१७४४४

**सर्व जाहिरातदार, बॅनर्सदार, देणगीदार, आश्रयदाते व हितचिंतकांचे प्रतिष्ठान मनःपूर्वक आभारी आहे !**




**३० व्या 'आम्ही भिडे' अंकाचे प्रकाशन - गोवा.**

दरवर्षीप्रमाणे कला, उद्योजक, आपली सून, माझी आई, आदर्श कार्यकर्ता आणि क्रीडा पुरस्कार प्रदान केले गेले. भोजनामध्ये सुद्धा सोलकढी, मणगणे, खदखद ह्यांसारखे विविध पदार्थांची चव भिडे मंडळींना मिळाली. सकाळी नाष्ट्याला सुद्धा उसळ पाव होता. त्यामुळे नेहमीच असणारे इडली, पोहे, उप्पीट ह्यापेक्षा वेगळी चव चाखता आली. गोवा संमेलनासाठी उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. एवढेच नव्हे तर आज पावेतो सुद्धा सुंदर प्रतिक्रिया येत आहेत. या संमेलनाच्या नियोजनामध्ये डॉ. देविदास, रामकृष्ण, सौ. मालिनी, आदित्य, सर्वेष, संतोष, भक्ती, प्रवीण, प्रशांत, सौ. वनिता, मिलींद, अंजली, प्रदीप, मेघना, अस्मिता, उषा, संजय यांचेसह केटरर श्री. श्यामसुंदर ह्या सर्व भिडे मंडळींबरोबर माहेरवाशीण सौ. सर्वदा जोशी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संमेलन सांगता कारताना प्रतिष्ठानकडून ह्या गोवा स्थानिक भिडे मंडळींची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

पुढील वर्षीच्या संमेलनाची जबाबदारी घेण्याची तयारी सांगली भिडे मंडळींनी दाखविली आहे. परंतु त्यांचेबरोबर बैठका घेऊन त्याची निश्चिती करण्यात येईल.

# लघुकथा स्पर्धा

'आम्ही सारे ब्राह्मण' ह्या पाक्षिकातर्फे कै. वामन वि. भिडे, पुणे पुरस्कृत लघुकथा स्पर्धा ठेवण्यात आलेल्या आहेत. यंदाचे द्वितीय वर्ष आहे. ह्या स्पर्धेकरिता पहिले तीन आणि उत्तेजनार्थ दोन अशी पारितोषिके ठेवण्यात आलेली आहेत. प्रथम क्रमांकास १,००० रु., द्वितीय क्रमांकास रु. ७५० आणि तृतीय क्रमांकास रु. ५०० आणि उत्तेजनार्थ प्रत्येकी रु. ३०० अशी पारितोषिके असतील. लेखकांसाठी कथा पाठविण्याची अंतिम तारीख ३० जून २०१७ अशी असून अधिक माहितीसाठी संस्थेच्या कार्यालयात संपर्क साधावा. सदर स्पर्धेचा निकाल व बक्षीसपात्र ३ कथा २०१७ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध करण्यात येतील. कथा पाठविण्याचा पत्ता -

आम्ही सारे ब्राह्मण कार्यालय, आफिस क्र. ३ व ४, दुसरा मजला, मंगलमूर्ती कॉम्प्लेक्स, सुमधु हॉटेलचे वर, ॲक्सीस बँकेसमोर, सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०३०. संपर्क क्र : ८८०५९८१६७३

# जागतिक चिमणी दिन

शब्दांकन...
दिलीप भिडे, पुणे

२० मार्च हा जागतिक चिमणी दिन म्हणून पाळला जातो. 'या चिमण्यांनो परत फिरा रे, घराकडे आपुल्या' हे मा. गीतकार ग. दि. माडगूळकर यांचे गाणे ह्या दिवशी लागू पडते. पण हल्ली 'या चिमण्यांनो' असेच म्हणावे लागते. निसर्गाची ओळख मानवाला प्रथम चिमणी पासून होते. 'एक घास चिऊचा' असे सांगतच आपली आई आपणांस एक एक घास भरवते. प्रत्येकाचे बालपण ह्या आठवणींशी जोडले गेले आहे. चिमणी काळाच्या ओघात दिसेनाशी झाली. आताच्या पिढीला मात्र चिमणीचा चिवचिवाट कानी पडणे दुर्मिळ होत चालले आहे. कविता आणि बडबड गीते यांतच चिमणी शिल्लक राहते की काय असे वाटू लागले आहे. कौलारू घरे, धान्य निवडणारी महिला आणि उड्या मारत धान्य टिपणारी, बागडणारी चिमणी दिसत नाही. सिमेंटच्या जंगलामुळे वृक्षतोड मोठ्या प्रमाणात झाली. कधी काळी चिमण्यांच्या चिवचिवाटाने होणारी घरातील सकाळ आता केवळ आठवणींतील एक अनुभूती झाल्याची स्थिती आहे. ह्या पार्श्वभूमीवर चिमण्यांचे संरक्षण व त्या विषयी जागरूकता यासाठी २० मार्च ह्या दिवशी जागतिक चिमणी दिन पाळला जातो. या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या बागेत, परसात जर त्यांच्या खाद्याची व्यवस्था केली तर आपल्याला चिमण्या दिसू लागतील. नाशिकचे ॲड. अविनाश भिडे व सौ. भिडे हे फर्निचरपासून बनविलेले एक घरटे मोफत भेट देणार आहेत. पक्ष्यांवर प्रेम करताना नुसते दाणे टाकून भागणार नाही, तर त्यांना या घरट्यात जीवन जगण्याची उमेद मिळणार आहे. म्हणून या दिनानिमित्त चिमण्यासाठी वर्षभर शंभरावर घरट्यांची भेट नाशिकचे प्रसिद्ध कायदेतज्ञ ॲड. अविनाश भिडे व सौ. आदिती भिडे देणार आहेत. या संबंधी त्यांचा प्रसिद्ध झालेला लेख व फोटो खाली देत आहोत.

## इवल्याशा जिवासाठी ॲड. भिडेंची घरकुल योजना

### फर्निचरपासून घरटे बनवून मोफत भेट देणार

ऊन, वारा आणि पावसाचा सामना करताना काँक्रिटच्या जंगलात माणसांकडून आसरा शोधणाऱ्या चिमण्या पाखरांना आता हक्काचे घरटे मिळणार आहे. पक्ष्यांवर प्रेम करताना नुसते दाणे टाकून भागणार नाही. तर त्यांना या घरट्यात जीवन जगण्याची उमेद मिळणार आहे. जागतिक चिमणी दिनानिमित्त चिमण्यासाठी वर्षभर शंभरावर घरट्यांची भेट प्रसिद्ध कायदेतज्ञ ॲड. अविनाश भिडे आणि सौ. आदिती भिडे देणार आहे.

शहरात वाढत्या लोकसंख्येमुळे झाडे तोडून दहा मजल्यांपर्यंत इमारती उभ्या राहत आहेत. त्यामुळे चिमणी पाखरं दिसेनाशी होत आहेत. त्यांना हद्दपार व्हावे लागत आहे. अनेकांनी झाडे



नाशिक : जागतिक चिमणी दिनांच्या पूर्वसंध्येला रविवारी चिमणीप्रेमींना भेट देण्यासाठी ॲड. अविनाश भिडे व आदिती भिडे यांनी आणलेली घरटी.

जगविण्यासाठी झाडांची रोपे शुभेच्छा व भेटवस्तूच्या रूपात देण्याचा उपक्रम राबविला आहे. पण, झाडे वाढून चालणार नाही तर त्यावर सायंकाळी पक्ष्यांचा किलकिलाट झाल्याशिवाय जगण्यात मौज नाही. ॲड. भिडे आणि सौ. भिडे यांच्या चांडक सर्कल येथील घरात खिडकीत अनेक चिमण्या येऊ लागल्यावर त्यांच्यासाठी त्यांनी सुरुवातीला दाणा-पाण्याची व्यवस्था केली. त्यामुळे चिमण्यांचे थवेच जमू लागले. आदिती यांनी मग या चिमण्यांसाठी खास लाकडाचे घरटेच बनविले.

चिमण्या त्यात ऊन, वारा, पावसापासून आसरा शोधताना हक्काच्या घरात राहू लागल्या. आदिती यांनी शंभरावर अधिक घरटी बनवून भेटवस्तूच्या रूपात देण्याचा निश्चय केला. जागतिक चिमणी दिनानिमित्त वर्षभर चिमण्यांसाठी घरटे हवे असणाऱ्यांनी ॲड. भिडे यांच्याशी संपर्क साधल्यावर विनामूल्य सुंदर घरटे दिले जाईल. ॲड. भिडे यांनी तर वर्षभर भेटवस्तूच्या रूपात स्नेह्यांना घरटे भेट देण्याचा संकल्प केला. ज्यांना या उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा असेल त्यांनी आपल्या घरातील जुने फर्निचरचे लाकूड दिल्यास त्यापासून अप्रतिम घरटे बनवून मोफत भेट देण्यात भिडे दांपत्य पुढाकार घेणार आहे. त्यासाठी ॲड. भिडे (मो. ९४२२२५६२११) यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन केले आहे.

## प्रतिसाद !

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडून माझी मुलगी कु. गौरी हिला सलग दोन वर्षे आर्थिक शैक्षणिक साहाय्य मिळाल्यामुळे मिस गौरी एम.एस्सी. होणार आहे, ह्याचा मला अभिमान आहे. सहकार्याबद्दल भिडे प्रतिष्ठानला धन्यवाद.

**- दीपाश्री दिवाकर भिडे,**
दापोली, जि. रत्नागिरी

# गोवा भिडे कुलसंमेलन २०१७ : प्रतिक्रिया

✼ संमेलन खूप छान झाले. उत्तम व्यवस्था आणि कार्यक्रम सुंदर.
– *सौ. मृणाली नी. भिडे* (डोंबिवली)

✼ संमेलन उत्कृष्ट तसेच बाहेर गावाहून आलेल्या भिडे बंधू-भगिनींची निवास व भोजन व्यवस्था योजनाबद्ध होती. – *व्यंकटेश भिडे* (ठाणे)

✼ संमेलनात मजा आली आणि नव्या भिड्यांची भेट झाली.
– *सौरभ भिडे* (रायबंदर, गोवा)

✼ संमेलन छान झाले. नियोजनबद्ध कार्यक्रम, भिडे मंडळींची भेट व ओळख झाली. भोजन-निवास व्यवस्था छान व नियोजनबद्ध असे संमेलन. – *प्रदीप ज. भिडे* (डोंबिवली)

✼ कार्यक्रम सादरीकरण व नियोजन उत्कृष्ट आणि गोवा दर्शनची संधी मिळाली. – *दिलीप ज. भिडे* (पुणे)

✼ संमेलन उत्तम झाले. – *विजयसिंह भिडे* (नाशिक)

✼ गोवा संमेलन उत्कृष्ट आयोजन. आयोजकांचे मनःपूर्वक अभिनंदन !
– *मंदार भिडे* (रत्नागिरी)

✼ भोजन व्यवस्था, सांस्कृतिक कार्यक्रम वाखाणण्यासारखे होते. संमेलन नियोजन उत्तम. मनःपूर्वक धन्यवाद.
– *अनंत श्रीधर भिडे* (मिरज)

✼ भिडे संमेलनास प्रथमच आले. कार्यक्रम व भोजन व्यवस्था उत्तम. माहेरवाशीण म्हणून मला कार्यक्रमात सहभागी होता आले. धन्यवाद.
– *सौ. सायली शिरडकर* (भिडे)

✼ उत्कृष्ट नियोजन, कुठेही कंटाळा आला नाही.
– *आनंद काकतकर* (मुंबई)

✼ सांस्कृतिक कार्यक्रम सुंदर तसेच मुदपाकखान्याचे नियोजन श्री. श्यामसुंदर भिडे यांना बल्लवाचारीच म्हणावे लागेल.
– *विनायक वि. भिडे* (पुणे)

## भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### एप्रिल

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुहास दत्तात्रय भिडे, सातारा | १ |
| २. | सौ. सुनंदा वसंत भिडे, पुणे | १ |
| ३. | श्री. महेश मधुसुदन भिडे, अलिबाग | २ |
| ४. | सौ. पूर्वा प्रमोद देवधर, दादर | २ |
| ५. | श्रीधर रामचंद्र भिडे, चिपळूण | २ |
| ६. | सौ. अलका केशव भिडे, पुणे | ६ |
| ७. | सौ. पौर्णिमा धनंजय भिड, पुणे | १३ |
| ८. | कु. भूषण गजानन भिडे, अलिबाग | १५ |
| ९. | श्री. केशव मोरेश्वर भिडे, पुणे | १६ |
| १०. | श्री. रमेश रामचंद्र भिडे, डोंबिवली | १७ |
| ११. | श्री. संजय शंकर भिडे, मुंबई | १७ |
| १२. | श्री. संतोष वसंत भिडे, ठाणे | १८ |
| १३. | श्री. अरविंद श्रीपाद भिडे, पुणे | २० |
| १४. | सौ. मधुरा श्रीकांत भिडे, रोहा | २३ |
| १५. | श्री. विनायक सदाशिव भिडे, धुळे | २४ |
| १६. | चि. अथर्व विवेक भिडे, रत्नागिरी | २४ |
| १७. | श्री. धनंजय केशव भिडे, पुणे | २४ |
| १८. | ॲड. अविनाश ज. भिडे, नाशिक | २४ |
| १८. | सौ. शर्मिला नितीन पुराणिक, पुणे | २५ |
| २०. | श्री. भास्कर प्रभाकर भिडे, पुणे | २६ |
| २१. | श्री. यशवंत रामचंद्र भिडे, कांदिवली | २७ |
| २२. | कु. अक्षत विवेक भिडे, दिल्ली | २८ |
| २३. | कु. अक्षन विवेक भिडे, दिल्ली | २८ |
| २४. | सौ. कीर्ति प्रशांत भिडे, पुणे | २८ |

### मे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अरविंद नरहरी भिडे, पुणे | ३ |
| २. | सौ. वृषाली विठ्ठल भिडे, डोंबिवली | ३ |
| ३. | सौ. शुभांगी वामन भिडे, पुणे | ५ |
| ४. | सौ. स्नेहा नितीन भिडे, पुणे | ५ |
| ५. | श्री. आशिष अनिल भिडे, भोपाळ | ६ |
| ६. | मिताली मंदार भिडे, रत्नागिरी | ९ |
| ७. | कु. मृण्मय मंदार भिडे, रत्नागिरी | १० |
| ८. | श्री. शरद हरी भिडे, पुणे | ११ |
| ९. | श्री. राजेश शरद भिडे, पुणे | ११ |
| १०. | श्री. विश्वनाथ शंकर भिडे, बदलापूर | १३ |
| ११. | सौ. पूनम अमित भिडे, पुणे | १३ |
| १२. | कु. मैत्रेयी सुहास भिडे, पुणे | १३ |
| १३. | श्री. यज्ञेश्वर भालचंद्र भिडे, पुणे | १७ |
| १४. | सौ. अर्चना अशोक भिडे, पनवेल | १९ |
| १५. | श्री. मंदार उदय भिडे, देवरुख | १९ |
| १६. | सौ. माया सुनिल भिडे, पुणे | १९ |
| १७. | श्री. सुभाषचंद्र नरहर भिडे, पुणे | २२ |
| १८. | कु. सदिच्छा सतीश भिडे, मुंबई | २३ |
| १९. | कु. ओम चंदन भिडे, पुणे | २४ |
| २०. | सौ. अभिलाषा रोहन भिडे | २४ |
| २१. | सौ. रेखा प्रकाश भिडे, डोंबिवली | २५ |
| २२. | श्री. अजय बाळकृष्ण भिडे, पुणे | २६ |
| २३. | कु. रिचा विक्रम भिडे, हैद्राबाद | २६ |
| २४. | कु. अपूर्व राजेंद्र भिडे, डोंबिवली | २७ |
| २५. | सौ. मंगला प्रदीप कुलकर्णी, भांडुप | २७ |
| २६. | चि. भार्गवी विक्रांत भिडे, पुणे | २८ |
| २७. | श्री. संजय प्रभाकर भिडे, माणगांव | २९ |
| २८. | सौ. अनुराधा चंद्रकांत भिडे, पुणे | २९ |
| २९. | श्री. प्रवीण प्रभाकर भिडे, पुणे | २९ |
| ३०. | श्री. विनयकुमार भिडे, बेंगलोर | २९ |
| ३१. | श्री. विजयसिंह विष्णू भिडे, नाशिक | ३१ |

### जून

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. वर्षा दिलीप भिडे, पुणे | १ |
| २. | सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे | १ |
| ३. | अमोल मुकुंद भिडे, सांगली | २ |
| ४. | कु. अमृता चंदन भिडे, पुणे | ५ |
| ५. | सौ. प्रिया सुनील भिडे, पुणे | ६ |
| ६. | सौ. सुनीता विजय भिडे, ठाणे | ८ |
| ७. | सौ. आदिती अविनाश भिडे, नाशिक | ९ |
| ८. | सौ. कीर्ती नरेंद्र देव, पुणे | ९ |
| ९. | सौ. रश्मी अमेय भिडे, पुणे | १२ |
| १०. | श्री. कुमार विष्णू भिडे, पुणे | १२ |
| ११. | सौ. गार्गी आदित्य जोशी, पनवेल | १३ |
| १२. | कमल बाळकृष्ण देवधर, गिरगांव | १४ |
| १३. | सौ. संगिता सतिश भिडे, नाशिक | १८ |
| १४. | कु. अश्विनी विजय भिडे, ठाणे | १९ |
| १५. | सौ. मधुमती चिंतामण भिडे, पुणे | २० |
| १६. | श्री. श्रीनिवास केशव भिडे, बेळगांव | २० |
| १७. | सौ. सुनीती विवेक भागवत, नाशिक | २१ |
| १८. | सौ. मोहिनी अविनाश भिडे, पुणे | २३ |
| १९. | सौ. नीला कुमार भिडे, पुणे | २३ |
| २०. | श्री. प्रतीक संतोष भिडे, ठाणे | २६ |
| २१. | श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे | २८ |
| २२. | श्री. उमेश अशोक भिडे, पनवेल | २९ |
| २३. | सौ. माधवी धनंजय भिडे, खालापूर | २९ |

# अभिनंदन



१) कोकण मराठी साहित्य परिषदेकडून २०१६-२०१७ करिता डॉ. सौ. प्रतिभा भिडे, ठाणे यांना नाटक एकांकिकेसाठीचा श्री. रमेश कीर पुरस्कार संगीत शिवलीला या त्यांच्या साहित्य कृतीला नुकताच मालगुंड, रत्नागिरी येथे कोमसापचे संस्थापक पद्मश्री मधुमंगेश कर्णिक यांचे उपस्थितीत प्रदान करण्यात आला. ह्या यशासाठी त्यांचे भिडे प्रतिष्ठानकडून हार्दिक अभिनंदन !

२) 'आम्ही सारे ब्राह्मण' ह्या पाक्षिकातर्फे दिवाळी अंकासाठी घेण्यात येणाऱ्या लघुकथेच्या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून भिडे प्रतिष्ठानचे सचिव आणि आम्ही भिडे अंकाचे संपादक श्री. दिलीप भिडे, पुणे यांची निवड झाली. त्यांचे हार्दिक अभिनंदन !

३) झी-मराठी तर्फे रत्नागिरीत घेतलेल्या 'संक्रांत क्वीन' स्पर्धेचा प्रथम पुरस्कार साईश्री नृत्यसंस्थेच्या संचालिका आणि प्रतिष्ठानच्या महिला समिती सदस्य सौ. मिताली भिडे, रत्नागिरी यांना संक्रांत क्वीन पुरस्कार प्रदान करण्यात आला. अंतिम फेरीमध्ये १६ जणींची निवड करण्यात आली. टॅलेंट फेरीमधून ७ जणींमधून ३ जणींची अंतिम निवड होऊन प्रथम क्रमांक सौ. मिताली भिडे यांना मिळाला. त्यांचे हार्दिक अभिनंदन !

४) फल ज्योतिष संशोधन ज्ञानपीठ, पुणे यांचेकडून श्री. प्रसन्नकुमार मोरेश्वर भिडे, पुणे ह्या ज्येष्ठ भिडे बंधूना 'ज्योतिष भास्कर' ही पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली. ह्याशिवाय प्रबंधाचे उत्तम सादरीकरणासाठी विशेष पारितोषिक मिळाले. त्याबद्दल श्री. प्रसन्नकुमार भिडे यांचे भिडे परिवाराकडून अभिनंदन !




## माहे जानेवारी ते मार्च २०१७ पर्यंतचे देणगीदार


| | | | |
|---|---|---|---|
| १) | सौ. सविता सुनिल भिडे, चिंचवड, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| २) | सौ. अर्चना प्रसन्न जोगळेकर, रत्नागिरी | १,०००/- | आजीव सभासद |
| ३) | श्री. मंदार भगवान भिडे, रत्नागिरी | ९००/- | आजीव (भाग) सभासद |
| ४) | श्रीमती गीता भिडे, रत्नागिरी | १,०००/- | आजीव सभासद |
| ५) | सौ. वर्षा विलास भिडे, मालाड, मुंबई | १,०००/- | आजीव सभासद |
| ६) | श्री. विलास राजाराम भिडे, मालाड, मुंबई | १,०००/- | आजीव सभासद |
| ७) | गोवा कुल संमेलन देणगी, गोवा | १२,०००/- | देणगी |
| ८) | श्री. विजयराव रघुनाथ भिडे, ठाणे | ११,०००/- | शैक्षणिक देणगी |
| ९) | श्री. सुरेशराव रघुनाथ भिडे, ठाणे | ११,०००/- | शैक्षणिक देणगी |
| १०) | सौ. मानसी मेघःश्याम सोमण, गुहागर | ५००/- | देणगी |
| ११) | श्री. कुमार विष्णू भिडे, पुणे | १,००,०००/- | वैद्यकीय निधी देणगी |
| १२) | सौ. नीला कुमार भिडे, पुणे | १,००,०००/- | वैद्यकीय निधी देणगी |
| १३) | डॉ. प्रमोद रामकृष्ण भिडे, गोवा | १,०००/- | आजीव सभासद |
| १४) | श्री. केदार गोविंद भिडे, माभळे, रत्नागिरी | १,०००/- | आजीव सभासद |
| १५) | श्री. प्रदीप जनार्दन भिडे, डोंबिवली | ५००/- | वाढदिवस देणगी |
| १६) | सौ. रोहिणी प्रभाकर भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| १७) | सौ. अस्मिता प्रवीण भिडे, गोवा | १,०००/- | आजीव सभासद |

## कुस्तीगीर भिडे गुरुजी

भटजी पैलवान योगी अरविंदांचे गुरू डॉ. खानखोजे यांचे सहकारी, तालीम मास्तर म्हणून १०० वर्षांपूर्वी प्रसिद्ध असलेले कै. दामोदर बळवंत भिडे गुरुजी यांचे पुण्यस्मरण. (मृत्यू ७-१२-१९४८.) त्यांचा जन्म २२ जुलै १८७६ रोजी पुणे येथे झाला. कुस्ती, दांडपट्टा, मल्लखांब व फरीद्रा हे त्यांचे आवडीचे विषय होते. भिडे गुरूजी हे एक नामांकित तालीम मास्तर म्हणून कुस्ती क्षेत्रात प्रसिद्ध होते. सातारा येथे त्यांचे नावाने भिडे गुरुजी व्यायाम मंदिर चालविले जाते. साताऱ्यातील हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये भाग घेणारे श्रीरंग पैलवान त्यांचे शिष्य. माहुली जवळील महागाव हे त्यांचे गाव, माजी आमदार बुद्धवासी खंडेराव सावंत हे पण त्यांची आठवण सांगत. कर्नल काळांगे, दत्तोपंत परांजपे असे अनेक शिष्य होते. त्यांनी इंदौर, देवास, ओंकारेश्वर, लोणार, जळगाव, धुळे अश्या अनेक ठिकाणी तालमीसाठी भेटी दिल्या. ते चाफेकर बंधूंचे स्नेही होते. रँड खून प्रकरणी भिडे गुरुजींनाही चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात त्यांनी काम केले. पंढरपूर, अकोला येथेही त्यांनी व्यायाम प्रकाराचे शिक्षण दिले. सातारा येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये त्यांनी व्यायामाचे धडे दिले. त्यांच्या शिष्यांकडून १९३५ साली लोकनायक अणे यांचे हस्ते रु. २,००० (आताचे दहा लाख)ची थैली देऊन सत्कार करण्यात आला. आर.एस.एस.च्या शाखांचे दैनंदिन व्यायामासाठी त्यांनी सुचविलेले व्यायाम प्रकार आजही चालू आहेत. डॉ. हेडगेवार प्रश्नमंजुषामध्ये त्यांचे नावाचा उल्लेख आहे. डॉ. हेडगेवार त्यांना गुरू मानत. एकदा सातारा येथे हेगडेवार आले असता भिडे गुरुजींना पाहून ते त्यांचे पुढे नतमस्तक झाले. गुरूजींना आयुर्वेदिक औषधींची माहिती होती.ते माझे आजे सासरे होते. (सौजन्य : माधव विद्वांस (नातजावई)



सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान गरजू व गुणवान विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी, शैक्षणिक निधीमधून आर्थिक साहाय्य देत आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थिनींसाठी 'प्रदीप व डॉ. शीला भिडे' ह्या निधीमधून विना परतफेड विशेष आर्थिक मदत करीत आहे. मागील आर्थिक वर्षात ४ विद्यार्थिनींना आर्थिक साहाय्य केल्याचे आपणांस माहितच आहे. तसेच वैद्यकीय निधीमधून वेळोवेळी आर्थिक साहाय्य दिले जात आहे. तरी भिडे कुळातील व्यक्तींनी प्रतिष्ठानकडे अर्ज आणि संबंधित कागदपत्रांसह अर्ज केल्यास गरजूंना आर्थिक साहाय्य उपलब्ध होऊ शकते.






# आर. जी. ज्वेलर्स

**चोख सोने-चांदी व अद्ययावत दागिन्यांचे दालन**

पंचमुखी प्लाझा, गाळा नं. १, १४९, सदाशिव पेठ,
श्री पंचमुखी गणेश मंदिरासमोर, सातारा
प्रोप्रा. राहुल घाडगे
मो. ९९२२८९९९९८

# समाज, कायदा आणि त्याचे पालन



- श्रीमती सुमती क. भिडे
५८, नटराज, कर्वेनगर, पुणे-५२

समाज म्हणजे काय ? समाजासाठी कायदा. प्रत्येक कुटुंब ! अशा अनेक कुटुंबांचा मिळून समाज तयार होतो. प्रत्येक खेड्यात, शहरात, प्रांतात, राज्यात, देशात ह्या समाजधारणेसाठी सुरळीत सुराज्य चालवायचे असेल तर कायदा आवश्यक असतो.

समाजात दारुडे, चोर, बलात्कारी असे अनेक दुष्कृत्यांच्या आहारी गेलेले लोक असतात. त्यांच्या दुष्कृत्यांना आळा घालण्यासाठी, जरब बसवून त्यांना तुरुंगात खडी फोडायला लावण्यासाठी कायदा आवश्यक असतो. ह्याशिवाय कायद्याचे उल्लंघन करून तंबाखू, अफू, गांजा, कोकेन अशा अगणित बुद्धिभ्रंश करणाऱ्या वस्तूंचे बेकायदा, बेमालूम वाटप होत असते. आमच्या महिला मंडळातर्फे शाळा, कॉलेजमधून जाऊन मुलांच्या मुलाखती घेतल्या तेव्हा लक्षात आले की, कॉलेजमध्येच काय ? शाळांतूनसुद्धा थोड्याशा अपयशाने नैराश्य येऊन खचून जाऊन ह्या पांढऱ्या पुड्यांचे 'दम मारो दम, मिट गया गम' अशा उद्देशाने सेवन चाललेले असते. आणखी कितीतरी प्रकारचे अगणित गुन्हे क्षणोक्षणी समाजात घडत असतात. गरिबांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार कर्ज देतात. त्यांचा अंगठा कर्जरोख्यांवर घेतात. अशिक्षितपणाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडत राहतात. ह्या सर्वांना आळा बसविण्यासाठी साऱ्या जगात कठोर कायदे केले जातात. गुन्ह्यानुसार त्या प्रमाणात साधा तुरुंगवास, सक्तमजुरी, खुनासाठी फाशीची शिक्षा दिली जाते. त्यासाठी कायदेतज्ञ वकील, न्यायाधीश लागतात. त्यांना लॉ कॉलेजमधून वकिलाची डिग्री बी.ए. एल.एल.बी., एल.एल.एम. घ्यावी लागते. प्रथम समाजातील कुटुंबापासूनच कायदा पालनाची शिकवण दिली जाते. कसे ते पाहूया.

कायदा, शिस्त, नीतिमत्ता हे एकमेकांशी संलग्न घटक आहेत. लहान बाळाला शिस्तपालनाचे बाळकडू मातेकडूनच मिळत असते. साध्या साध्या गोष्टींत प्रेमाने, वात्सल्याने मातेकडून शिस्तीचे म्हणजेच कायदा पालनाचे धडे दिले जातात. जीवनात 'वेळच्या वेळी' आणि 'जागच्या जागी' ह्या उक्तीला फार महत्त्व असते. वेळेवर उठणे, उठल्याबरोबर आपले अंथरुण, पांघरुण आवरणे, शाळेत जायच्या आधीच दहा मिनिटे तयार असणे, गृहपाठ रात्रीच उरकून दप्तर भरून ठेवणे.

**वेळच्या वेळी आणि जागच्या जागी -**

वेळच्या वेळी सर्व गोष्टी उरकण्यामुळे वेळेचा अपव्यय होत नाही. जागच्या जागी वस्तू न ठेवल्यास धांदरटपणा वाढतो. 'आई, माझं पेन सापडत नाही, स्कूल ड्रेस कुठे आहे' असे मुलांचे हाकारणे सुरू होते. अशा वेळी माता कठोर होऊन सांगते, 'मी शोधून देणार नाही. तुझं तू जाग्यावर ठेवत जा'. आयुष्यात पुढे उच्च शिक्षणासाठी, आजच्या स्पर्धेच्या, धकाधकीच्या जीवनात वेळेला फार महत्त्व आहे. एक-एक क्षण महत्त्वाचा असतो. ह्या धावत्या जगात 'थांबला तो संपला' अशी स्थिती आहे. म्हणूनच स्वतःच स्वतःला कायद्याचे बंधन घालून घेणे आवश्यक असते. सुरुवातीला माताच हे कायद्याचे, शिस्तपालनाचे धडे देते आणि म्हणूनच आपल्या धर्मात प्रथम नमस्कार मातेलाच असतो. 'मातृदेवो भव' त्यानंतर मुलांचे शालेय शिक्षण सुरू होते.

**शाळांमधील शिस्त आणि कायद्याचे पालन -**

शाळा सुरू होण्याची घंटा वाजण्याआधीच सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती आवश्यक असते. ही शिस्त पाळावीच लागते. उशिरा येणाऱ्या मुलांना प्रथम शाळेच्या मुख्य शिक्षकांसमोर हजर व्हावे लागते. मुख्य शिक्षक त्यांना शिस्तीचे, शाळेच्या कायद्याचे पालनाचे महत्त्व समजावून सांगतात. तरीही काही मुले उनाडक्या करीत शाळेत उशिराच येतात तेव्हा त्यांचे पालकांकडे तक्रार नोंदविली जाते. शिक्षणाची आवड नसणे, मन मानेल तसे वागणे, शिक्षकांबद्दल आदर न ठेवता त्यांची टिंगलटवाळी करणे हे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. अशी मुले लहान वयातच कुमार्गाला लागतात. परिणामी दारू, जुगार, गांजा ह्यांच्या आहारी जातात आणि बालगुन्हेगार होतात.

शाळा सुरू झाल्यावर प्रथम सर्व मुले शाळेच्या मैदानावर एकत्र जमून प्रार्थना म्हणतात. जीवनात प्रार्थनेला फार महत्त्व आहे. पूर्वी आमच्या लहानपणी एकत्र कुटुंब असे. प्रत्येक घरात मोठे देवघर असे. सकाळी उठल्यावर 'कराग्रे वसते लक्ष्मी, करमध्ये सरस्वती, कर मुले तू गोविंद प्रभाते करदर्शनम्' ही प्रार्थना आजी म्हणायला शिकवायची. किती चांगला अर्थ आहे ह्याचा. 'हे माझ्या बोटांनो, तुमच्या हातात लक्ष्मी वसत आहे, उठा, शिक्षण घ्या, उच्चशिक्षित व्हा, लक्ष्मी तुमच्या हातात येईल'.

शिक्षणामुळे तुम्हाला नोकरीच्या संधी गवसतील आणि तुम्ही धनाढ्य व्हाल. त्यासाठी तुमच्या हातातच बसतेय. हाताचा उपयोग करा, ज्ञानी व्हा आणि करमुळाशी श्रीविष्णूची वस्ती आहे. त्यांचेप्रमाणे चतुर होऊन 'योगः कर्मसु कौशलम' अशा युक्तीने जीवन जगा. हे सर्व तुमच्या हातातच आहे. त्याचा उपयोग चांगल्या तऱ्हेने करा. कारण 'आत्मैव आत्मनो बंधु आत्मैव रिपुरात्मना'. आपणच आपले हित व अहित कशात आहे हे ओळखतो.

किती चांगल्या तऱ्हेने दिवसाची सुरुवात व्हायची. आता हे सर्व संपलेय. विभक्त कुटुंब पद्धती समाजात रुळलीय. घरातून देवघराचे उच्चाटन झालेय. छोट्याशा ३-४ रुमच्या सदनिका. त्यामध्ये फक्त 'हम दो हमारे दो या एक' एवढेच कुटुंब राहतेय. देव असेलच तर कुठेतरी फळीवर त्यांना बसावे लागतेय. एखादे फूल किंवा नुसती

व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !



## समाज, कायदा आणि त्याचे पालन

उदबत्ती ह्यावरच त्यांना समाधान मानावे लागतेय. देवांबरोबरच आजी-आजोबांनाही ह्या घरात स्थान नाही. आई-वडील दोघेही अर्थार्जन करण्यासाठी सकाळीच घराबाहेर पडलेले, सर्व सुखसोयींनी युक्त अशा घरात मुले आयादायांकडे किंवा पाळणाघरातून वाढतात. त्यांच्यात असुरक्षित असल्याची भावना निर्माण होते.

मानसशास्त्र असे सांगते की, बाळास वयाच्या ५-६ वर्षांपर्यंत सुरक्षित बाल्याची अत्यंत आवश्यकता असते. अगदी पाळणाघरातले बाळसुद्धा भोवतालच्या वस्तुस्थितीच्या संवेदना टिपत असते. ५-६ वर्षांच्या कालावधीत ते बाल्य मूलं आयुष्यात कधीही विसरत नाहीत. आई आजीच्या हाताचा मायेचा स्पर्श आणि आयादायांचा स्पर्श मुलं अचूक ओळखतात. मायेचा ओलावा नसलेली आया त्यांना नको असते. तिच्याजवळ त्यांना असुरक्षित वाटते. बालपणीच अनामिक भीतीने मुलं घेरली जातात. ह्या आयांच्या ताब्यात भरपूर पगार देऊन मुलं सांभाळण्यासाठी ठेवलेली असतात. पण नीतीभ्रष्ट आया मुलांना शाळेतून आल्यावर टीव्हीसमोर बसवून नको ते चमचमीत खाद्यपदार्थ त्यांच्या हातात देतात. काय बघावे ह्याची ह्या वयात उमज नसल्याने टीव्ही चॅनेल्सवर दाखविल्या जाणाऱ्या गुन्हेगारीच्या 'लक्ष्य'सारख्या मालिका, बलात्काराच्या घटना, चोऱ्यामाऱ्यांचे रंगवून सांगितलेले वृत्त बघून मुलांना 'आपणही तसेच करावे' असे वाटू लागते आणि यातूनच मग बालगुन्हेगार तयार होतात. जे उच्चशिक्षित घरातील मुलांचे तेच झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलांचेही. कारण झोपडीतही टीव्ही अत्यावश्यक झालाय. हे सर्व भयानक आहे. समाजाच्या दृष्टीने अतिशय घातक आहे. नुकतीच टीव्हीवर बातमी झळकली की, एका उच्चपदावर असणाऱ्या स्त्रीने तिच्या २ वर्षांच्या बाळाला सांभाळण्यासाठी आया ठेवली होती. खबरदारी म्हणून तिने घरात सी.सी.टीव्ही बसवून घेतला होता. तिला सीसीटीव्हीवरील दृश्य पाहून रडूच आले. ती आया त्या बाळाला मारत होती. पलंगावर फेकत होती. (अर्थात टीव्ही चॅनेल्सवर सर्वांनी ते दृश्य पाहिले असेलच.) त्यानंतर तिने आणि तिच्या पतीने बाळासाठी नोकरी सोडावी, असा निर्णय घेतला आणि आयाला अर्थातच तुरुंगाची हवा खावी लागली. हे झाले कुटुंबाच्या वाताहतीचे, त्यातच आता सुशिक्षित स्त्रिया लग्न होऊन सासरी आल्यावर घरी पडते घेऊन नव्या घरात समजुतदारपणा दाखवून घरामध्ये सामावून जाण्यास तयार नसतात. परिणामी 'हम करेसो कायदा' अशी अहंकारी वृत्ती होते. शिवाय ती मिळवती. त्यामुळे कुणावर आर्थिकदृष्ट्या अवलंबून नसते. परिणामी सासरची माणसे दुरावतात. आपल्या आई-वडील आणि भावंडांना दुरावल्यामुळे तिचा नवरा आतून मनातून दुखावलेला असतो. त्यातच ती स्त्री नवऱ्याशीही बेपर्वाईने वागू लागते. त्यातून मूल झाले की जबाबदारी वाढते. नातेवाईक दुरावलेले असल्याने मग त्यांच्यात तंटे सुरू होतात. अगदी घटस्फोटापर्यंत वेळ येते. शेवटी घटस्फोट होऊन नवेच प्रश्न समाजापुढे उभे राहतात. ह्या घटनांचा कोवळ्या मुलांवर भयंकर आघात होतो. झटपट निकालासाठी फॅमिली कोर्ट उभारली आहेत. त्या रोज ५,००० घटस्फोटांच्या अर्जांची भर पडत आहे. समाजधुरिणांना कुटुंब संस्थेच्या घराच्या भिंती ढासळताना दिसत आहेत. घटस्फोटित मुलांच्यात आई किंवा बाप एकाचेच प्रेम मिळणार असल्याने बापाकडे राहिल्यावर आई असूनही 'आईविना भिकारी' अशी अवस्था मुलांची होतेय. असुरक्षितपणाचे मुलांवर होणारे परिणाम आपण पाहिलेच आहेत.

पहिल्यांदाच सांगितलेय की, अनेक कुटुंब मिळूनच समाज बनत असतो. आता अशा बदफैली तरुणांपुढे आमच्यावेळी होते असे आदर्श नेते नाहीत. नेहरू, गांधी, लोकमान्य टिळक, गोपाळकृष्ण गोखले आणि कितीतरी उत्तुंग नेते. सावरकर, सुभाषचंद्र बोस आदी. वाटा वेगळ्या असल्या तरी सर्वांचे लक्ष्य एकच 'भारत स्वतंत्र करणे'. नीतीमान, चारित्र्यसंपन्न, देशहितासाठी, लोकहितासाठी झगडणारे नेते. आता असे नेते, असे नेतृत्व आढळते का ? रोज पेपरमध्ये विरोधी पक्ष नेते आणि राजगद्दीवर विराजमान असणारे नेते ह्यांच्या भ्रष्टाचाराच्या बातम्यांनी वर्तमानपत्र भरलेले असते. नावं कशाला घ्यायची ? रोज टिव्हीवर त्यांच्या कोट्यवधी इस्टेटींसह चित्रमय दर्शन होतेच आहे. कुठलेही खाते घ्या. पोलीस खात्याचाच समाजावर दरारा नाही. तसेच महापालिकेचे शिक्षण मंडळ नेहमीच चर्चेत राहिलेले आहे. पण दर्जेदार शैक्षणिक कामासाठी नव्हे तर भ्रष्टाचारासाठी सरकार महापालिकेच्या शाळांमधील गरजू विद्यार्थ्यांसाठी कोट्यवधी रुपये खर्च करते, पण त्या पैशावर नेमलेल्या विश्वस्तांनी उभा-आडवा हात मारलेला आहे. त्यांना पालिकेच्या तीन पदाधिकाऱ्यांनी पाठीशी घातलेय. शिवाय शिक्षक, शिपाई, रखवालदार अशा लोकांच्या भरतीसाठीही हे पदाधिकारी माया गोळा करतात. रस्त्यातून सिग्नल लाल असताना बेकायदा एखादा स्कूटरवाला जातो. चौकातील पोलीस पकडतात व चक्क म्हणतात, ५०० रुपये काढा, नाय तर चला चावडीवर ! शेतच कुंपण खातेय असा प्रकार.

अर्थात असे असले तरी देशात चांगलेही पुष्कळ होतेय. आपले शास्त्रज्ञ विविध प्रकारचे शोध लावत आहेत. थेट चंद्रापर्यंत पोहोचलोय आपण. अण्वस्त्रे, शस्त्रे निर्माण करतोय आपण. सरकार साऱ्या भोवतालच्या देशांमध्ये जाऊन भेटी देऊन एकमेकांना साहाय्य करू, संघटित होऊ अशी वृत्ती निर्माण करतेय. हळूहळू भ्रष्टाचार निर्मूलन होईल, अशी आपण आशा करूया. सध्या तरी गोधडी फाटली आहे तरीही 'यदा यदाही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत, अभ्युध्यानं अधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्' ह्या गीतेतील उक्तीनुसार परत कोणी श्रीकृष्णासारखा चतुर नेता येईल आणि धर्म म्हणजे मानवधर्म, सत्य, नीति, दया, करुणा यांनी भरलेला धर्म, मानव जातीच्या हिताला जपणारा धर्मात्मा निर्माण होईल आणि देशातील चैनलोलुपता भ्रष्टाचार जाऊन आपला देश म्हणजेच सर्व देशवासीय कायद्याचे कठोर पालन करून नीतीने जे मिळेल तेवढेच घेऊन देशाला 'सुजलाम् सुफलाम्' करतील अशी आशा करूया. कारण आपल्या प्रिय देशाला आपण मातेसमान मानतो. वंदे मातरम्।

चिमण्यांनो, साळुक्यांनो,
याल कधी या अंगणी
घरटी रिकामी आताशा
रुसल्या का ग साऱ्याजणी
होते कौलारू घरकुल
त्याच्या गई नी वळचणी
तुमची छोटी इलीपिली
घेत होत्या सांभाळुनी
मोबाईलचे टॉवर
झाले तुमच्या मुळावर
रेडिएशन दुणावले
झाला रिकामा शेजार
लिंब फणस अश्वत्थ
आता सुकुन गेले
बांधण्यासी इमारत
बिल्डरला ते खटकले
अंगणाच्या मातीमध्ये
किडे मुंग्या तृणधान
फरशी घालुनिया केले
तुमचे अन्न विसर्जन
इथे स्पर्श नाही आता
शुद्ध हवेचा उन्हाचा
चंद्र सूर्य ना दिसती
अडसर निळ्याशा काचेचा
ब्लॉक बंद दारापाठी
मी ही होतसे बेजार
झाला सिमेंटचा पिंजरा
केला आयात आजार

## कवितेच्या जगात

अगणित तारे तसेच वारे
मेघ आभाळ पाऊस सारे
इथे तिथे जीव धरतात
भावनांच्या जगात रमतात
त्यांचा श्वास जागा होतो
परिसरभर गंधाळू लागतो
आनंद ओसंडून भारून काढतो
कळ्या फुलांतून सांडून जातो
दुःखही नाही राहत मागे
आनंदाचे पकडून धागे
लपून छपून करते वार
शब्दात पाझरतो त्याचा विखार
कधी काही सांगायचे असते
मनातून भांडायचे असते
झाकायचे इथे काहीच नसते
शब्दांनाही कवितेत मिरवायचे असते
त्यासाठी एक नामी उपाय
भावनांना शब्दांनी द्यायचा न्याय
भावनांच्या आकृतींना मग
रंग रूप येऊ लागतात
कवितेच्या जगात शिरून
शब्द न् शब्द ऐश्वर्य भोगतात

***- डॉ. सौ. प्रतिभा भिडे, ठाणे***
*मो. ९८३३२८४६९०*


## ओंजळ

मनाच्या ओंजळीत थेंब थेंब विचारांचे
कधी टप टप आनंदाचे, कधी निराश चिखलाचे
मनाची ओंजळ कधी, कधी भरते सुखाने
ओसंडून जाते पाणी, मन भिजे आनंदाने
मनाची ओंजळ कधी राहते रे रिती
कोरड्या श्वासाचे मग वणवे पेटती
मनाची ओंजळ कधी कुणी वाटे सावरावी
प्रेमाच्या आधाराने हळू हातामध्ये घ्यावी
मनाची ओंजळ पुन्हा भरे होई रिती
ही रीत जीवनाची नको कशाचीही भीती
मनाची ओंजळ सदा वाहतच रहावी
सुख दुःख पाठोपाठ जणू नदीच वहावी

---

दुःखाचे ओझे आता नाही बाळगायचे
हळूच खाली ठेवून पुढे चालायचे
हेच तंत्र आहे तुखी जीवन जगण्याचे
मागे वळून आता नाही पाहायचे
गेला तो भूतकाळ, काळ कधी थांबलाय ?
सुख लांबवू म्हटले तरी कधी लांबलाय ?
दुःख संपवावे म्हटले तरी कधी संपलाय
आता फक्त वर्तमानातच जीव गुंतलाय
आज आहे, उद्या नाही हेच सत्य आहे
शाश्वत वाटणाऱ्या जगात सर्व अशाश्वत आहे
आता फक्त एकच ठरवायचं आहे
मिळाला क्षण माझा आहे, ह्याचे फक्त भान आहे

***- सौ. प्रिती भिडे, पुणे***
*मो. ९९२२९४४०८२*




**अभिनंदन ! :** पुणे येथे डेक्कन जिमखाना परिसरात राहणारे श्री. सुनिल भिडे (सी.ए.) व सौ. प्रिया भिडे यांनी आपल्या टेरेसवर शहरी शेती विकसित केली आहे. त्याची दखल 'द एनर्जी ॲण्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (टेरी) या संस्थेने घेऊन ह्या दांपत्याला 'ग्रीन हिरोज' पुरस्कार जाहीर केला आहे. भिडे प्रतिष्ठानकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन !



**अभिनंदन ! :** रत्नागिरी जिल्ह्यातील माभळे संगमेश्वर येथील सौ. अपर्णा अनिल भिडे यांना 'स्काऊटर गाईडर' पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. सौ. अपर्णा ह्या माध्यमिक विद्यामंदिर, ताम्हाणे संगमेश्वर येथील शाळेत शिक्षिका असून हा राज्यस्तरीय पुरस्कार त्यांना राज्यपालांच्या हस्ते दिला जाणार आहे.

सौ. अपर्णा भिडे यांचे भिडे प्रतिष्ठानकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा !

आदरणीय

कै. श्री. पांडुरंग रामकृष्ण भिडे ................ वडील

कै. ती. विमलाबाई पांडुरंग भिडे .............. आई

कै. ती. हरिहर पांडुरंग भिडे...................... बंधू


कै. ती. नीळकंठ पांडुरंग भिडे ................. बंधू

कै. ती. चंद्रशेखर पांडुरंग भिडे ................. बंधू

कै. ती. विजया हरिभाऊ देवधर ............... भगिनी

व

कै. राहुल चंद्रशेखर भिडे ........................ पुतण्या



यांचे स्मृतीस विनम्र अभिवादन करून

'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानास'

# हार्दिक शुभेच्छा !

श्री. दीनानाथ पांडुरंग भिडे

सौ. विदुला दीनानाथ भिडे

व

सौ. गार्गी आदित्य जोशी

**मुंबई कार्यालय : सौ. संपदा भिडे**
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),
मुंबई - ४०० ०२८.
मो. ९८१९९ ५१३९१

**• पत्रव्यवहारासाठी पत्ता •**
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
१४२६, सदाशिव पेठ, निलसदन, ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०.
मो. ९६२३०१७४४४

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले. संपादक : प्रफुल्ल डबीर
RNI No. : M-6 (1457)/70-RNI
Reg. No. KLR 136/15-17 Posted in Kolhapur RMS

साप्ताहिक — प्राजक्त
२८७, 'डी' वॉर्ड, कसबा गेट
गंगावेश रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०४२७


# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : 5 to 10 H.P.
Output Capacity : 500 Kg / hr.
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**



Power Require : 15 to 20 H.P.
Output Capacity : 1 Tonn / hr.
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : 25 to 30 H.P.
Output Capacity : 3 Tonn / hr.
Motor Driven Model also available

**CHAFF CUTTER**



Power Require : 2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.
Output Capacity : 200 Kg / hr., 400 Kg / hr., 800 Kg / hr.
Motor driven & Engine Driven Model also available

## INDUSTRIAL PRODUCTS

**PISTON VALVES**
**(FOR STEAM-LINE)**



IBR & Non IBR Piston Valve
Class 150, Class 300 & PN 40
Size 15 mm to 150 mm

**HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)**



Pressure - From 30 kg/cm² to 300 kg/cm²
Application - Chemical Injection, Cleaning
Drainage Pipes, Boiler feed etc.

**CASTINGS**



Heavy C.I. Castings
Maximum single piece -
2 Tonn

**S.G.IRON FOR AUTO COMPONENTS**



Castings :
Steel, Stainless Steel & S.G. Iron
Range - From 1 kg. To 100 kg.

**LADDLE**



Foundry Crane Laddles
Capacity : Upto 20 Ton